आजचा दिनविशेष
१९९५ : कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा जनस्थान पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत यांना जाहीर

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार ५ ऑक्टोबर २०२५ | अंक २८४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु








# दिवाळीच्या आधी हैदराबाद गॅझेटनुसार मराठवाड्यातील सगळ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र वाटायला सुरुवात करा

## तर फडणवीस, विखे तुमच्या नरड्यावर येईन, – मनोज जरांगे पाटील यांचा सरकारला मोठा इशारा

### पळायलाही जागा उरणार नाही

"ओबीसीत 400-500 जाती आहेत. छगन भुजबळ थोड्या माळ्यांचा नेता आहे, सगळ्या माळ्यांचा नाही. हे जातीचे नेते आहेत, यात ओबीसींचा संबंध नाही. काही गरज नाही याच्या मागेमागे पळायची. मुख्यमंत्र्यांना जाहीरपणे सांगणं आहे की, मराठ्यांच्या आरक्षणाच्या जीआरचा अवमान होईल, अस् त्यांचं ऐकून पाऊल उचलायच नाही. ती वेळ आमच्यावर येऊ देऊ नका. त्याचं ऐकून आमची प्रमाणपत्र थांबवू नका. दिवाळीच्याआधी हैदराबाद गॅझेटनुसार मराठवाड्यातील सगळ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र वाटायला सुरुवात करा. अन्यथा पुन्हा सरकारसाठी आंदोलनाचा वाईट दिवस येईल . तुम्ही मजा बघत असाल, आज करु, उद्या करु. तर फडणवीस आणि विखे तुमच्या नरड्यावर येईन, पळायलाही जागा उरणार नाही" असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.



"मराठ्यांच्या आरक्षणाला कुठही वेगळा फाटा दिला जाईल असं एकही पाऊल सरकारने आणि मुख्यमंत्र्यांनी उचलायचं नाही. आमचं आरक्षण हक्काच आहे. बाकीच्या भानगडीत मुख्यमंत्र्यांनी पडू नये, एवढी आम्हाला मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे. मराठ्यांच आणि मराठ्यांच्या पोरांचं वाटोळ होईल असं एकही पाऊल आपण जातीयवादी नेत्यांचं ऐकून उचलू नये" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. वडेट्टीवार म्हणतायत, मराठा आरक्षणासाठी जो जीआर केलाय तो रद्द करण्याची आमची मागणी आहे. "त्याचं कोण ऐकतय बुगळ्याच त्या. त्या लाल्याने सांगितलं असेल, दिल्लीत गांधी एक लाल्याने सांगितल असेल, मराठ्यांच्या विरोधात बोल म्हणून. कारण काँग्रेस मराठ्यांच्या विरोधात जास्त बोलतेय" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले., असं वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. "ओबीसींचा नेता कोणी नाही. जास्त बोलतात म्हणून मुख्यमंत्र्यांनी बोलवून घेतलं आहे. मुख्यमंत्र्यांना यांची औकात कळली आहे. हे ओबीसींचे नेते होऊ शकत नाही, हे देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आलय. त्यामुळे बापाची पेंड आहे का? जीआर रद्द करणं. हैदराबाद गॅझेटच्या आधारे जीआर काढलाय. आमची पण मागणी आहे, 1994 चा जीआर रद्द करा. वरच 2 टक्के आरक्षण ते पण रद्द करा. काहींनी असं सांगितलं की, आम्ही बंजारा समाजासारखे दिसतो. म्हणून बंजारा समाजाच आरक्षण घेतलं, ते बंजारा समाजासारखे दिसत नाहीत. त्यांना बाहेर काढा. यापुढे जशाला तशी फाईट होणार" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

# नवरा बायकोच्या भांडणात चार महिन्याच्या चिमुकल्याची काय चूक..

## मुलाला पाण्याच्या बॅरेल मध्ये टाकून वडीलांनी घेतला गळफास

बीड प्रतिनिधी - गेवराई तालुक्यातील तलवाडा तहत रामनगर येथे अगोदर चार महिन्याच्या मुलाला पाण्याच्या बॅरेल मध्ये टाकून वडीलांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.गेवराई तालुक्यातील तलवाडा तहत रामनगर येथील अमोल हौसराव सोनवणे व पायल अमोल सोनवणे या दांपत्याने चार दिवसापूर्वी घरगुती कारणावरून विषारी औषध प्रशासन केले होते. उपचारानंतर २/१०/२०२५ रोजी दसऱ्याच्या दिवशी ते घरी परतले. ३ रोजी पहाटे चार वाजताच्या दरम्यान अमोल हौसराव सोनवणे वय वर्ष ३० यांनी आपल्या पोटाच्या चार महिन्याच्या मुलाला पाण्याच्या बॅरेल मध्ये टाकले त्यानंतर स्वत:च्या घरात गळफास घेतला. अमोल सोनवणे सह चार महिन्याच्या बाळाचे तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले आहे. नवरा बायकोच्या भांडणात या चार महिन्याच्या चिमुकल्याची काय चूक होती असा प्रश्न उपस्थित होत आहे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# श्री क्षेत्र शृंगारुषी ऋषी गड या ठिकाणी दसरा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न,

## आमदार सुरेश आण्णा धस यांच्या स्थानिक निधीतून गडाचा विकास झाला, महंत सुरेशानंद महाराज शास्त्री

बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी बीड जिल्ह्यात यावर्षी तीन दसरा मेळावे, पार पडले नवीनच दसरा मेळावा गेल्या दोन वर्षापासून श्री क्षेत्र शृंगारऋषी गड या ठिकाणी चालू झाला, यावेळी या गडावर दसरा मेळावा निमित्त, बीड जिल्ह्यातून खूप मोठ्या प्रमाणात गर्दी बघायला मिळाली, यावेळी महंत सुरेशानंद महाराज शास्त्री कोळेकर यांच्या नेतृत्वाखाली सदरील दसरा




मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी महंत आपल्या भाषणात म्हणाले आहेत की सुरेश आण्णा धस यांनी गडासाठी खूप मोठ्या, प्रमाणात निधी दिलेला आहे, व गडाचा विकास त्यांच्यामार्फत झालेला आहे, यावेळी राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची भाषणे झाली, येणारा दसरा मेळावा लाखोच्या संख्येने होणार असल्याचे प्रतिपादन या गडाचे महंत सुरेशानंद महाराज शास्त्री कोळेकर यांनी म्हटले आहे, यावेळी जिल्हा भरातून भावीक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# अनुकंपा तत्वावरील व लिपिक श्रेणीतील जिल्ह्यातील १०८ उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरण

बीड,दि.४(प्रतिनिधी) : मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रम ाअंतर्गत अनुकंपा तत्वावरील गट–क संवर्गातील उमेदवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक–टंकलेखक संवर्गातील उमेदवारांना आज नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात आज आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक,




तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एम.एस. साळवे, जिल्हा कोषागार अधिकारी लहू गळगुंडे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम रवी तोंडे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रविण उखळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शासकीय सेवेत असतांना कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नी अथवा अपत्याला नोकरी दिली जाते. परंतू, तांत्रिक कारणे किंवा काही प्रशासकीय कारणास्तव या नियुक्त्या रखडलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना दीर्घ प्रतिक्षा करावी लागत होती. अशा या संवेदनशील विषयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून नवीन अनुकंपा धोरण तयार केले. त्याचाच परिणाम म्हणून आज अनुकंपा प्रतिक्षा यादीतील अनुकंपा उमेदवारांना एकाच वेळी नियुक्ती पत्रे देण्यात आली.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या हाती घेतलेल्या कार्यक्रम ांतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेण्यात आलेल्या लिपिक–टंकलेखक श्रेणीतील उमेदवारांना देखील नियुक्तीपत्रे देण्यात आली.

आज आयोजित या मेळाव्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांच्या हस्ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक–टंकलेखक संवर्गातील ६४ उमेदवार तसेच अनुकंपा तत्वावरील गट–क संवर्गातील ३६ आणि गट–ड संवर्गातील ०८ उमेदवार अशा एकूण १०८ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले.

# रामकिसन गोयकर या शेतकऱ्यांचा सोलार पाण्यात, सोलर पंपाचे लाखो रुपयांचे नुकसान,



बीड प्रतिनिधी . अंकुश गवळी
गेवराई तालुक्यातील दिमागवाडी परिसर या ठिकाणी, शेतकरी रामकिसन नामदेव गोयकर यांच्या शेतात या कंपनीने जीके एनर्जी 7.5.HP . या कंपनीचे सोलार बसवण्यात आले होते सदरील सोलार गट नंबर 388 परिसरात बसवले होते मागच्या काही दिवसापूर्वी .सिंदफणा नदीचे पाणी शेतामध्ये शिरल्यामुळे वॉटर डँबीस झाले आहे.मोठ्या प्रमाणात पाऊस असल्यामुळे शेतामध्ये सोलार पंपाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले,

# नगरसेवक आरक्षण सोडत तारीख जाहीर ! भावी नगरसेवकांनो कामाला,प्रचाराला लागा.

बीड दि. ४ : राज्यातील जिल्हापरिषद पंचायत समिती गट गणांच्या आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर झाल्या पाठोपाठ आता नगरपालिका निवडणुकांच्या हालचालींना देखील वेग आला आहे. नगराध्यक्षांसाठीची आरक्षण सोडत सोमवारी होत असतानाच आता नगरसेवकांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देखील राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे.त्यानुसार ८ ऑक्टोबर रोजी राज्यात सर्वत्र नगरपालिकानिहाय आरक्षण सोडत काढली जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीत ही आरक्षण सोडत होणार आहे.राज्यात आता स्थानिक स्वर:ज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेने वेग घेतला असून राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्हापरिषद पंचायत समिती आणि नगरपालिकांच्या निवडणुकांसाठी एकाचवेळी हालचाली सुरु झाल्या आहेत.नगराध्यक्ष पदासाठीची आरक्षण सोडत सोमवारी (दि. ६) मंत्रालयात होणार आहे. त्यासोबतच आता प्रत्येक नगरपालिकेतील नगरसेवकांच्या आरक्षणाची सोडत काढण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यानुसार ८ ऑक्टोबर रोजी यासाठी सर्वत्र बैठक होणार आहे.यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक नगरपालिकेला एका उपजिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करावयाची असून त्यांच्या देखरेखीखाली आरक्षण सोडत होणार आहे. अनुसूचित जाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग, त्यातील महिला आणि सर्वसाधारण महिला असे आरक्षण सोडतीद्वारे काढले जाणार आहे.नगरपालिका आरक्षणासाठी देखील पहिली निवडणूक हाच निकष आरक्षण चक्राकार पद्धतीने फिरविण्यासाठी जिल्हापरिषद पंचायत समितीच्या प्रमाणेच नगरपालिकांमध्ये देखील अंगांनी निवडणूक ही पहिली निवडणूक समजूनच आरक्षण सोडत काढली जाणार आहे. त्यामुळे कोणत्या प्रभागात यापूर्वी कोणते आरक्षण होते याचा विचार केला जाणार नाही

# जाहिराती देत नसलेल्या नेत्यांच्या बातम्या छापू नयेत–संपादक संघाचा निर्णय

बीड (प्रतिनिधी):– वृत्तपत्रांना जाहिराती न देणाऱ्या नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या बातम्या छापण्यात येवू नयेत असे बीडमधील मराठी वृत्तपत्रांच्या संपादकांनी आपसात विचार विनिमय करून निर्णय घेतला आहे. सर्व संपादकांनी सदर निर्णयाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे आवाहन संपादक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, जिल्ह्यातील सर्व मराठी वृत्तपत्रे सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्याच्या सर्व कार्यकर्त्यांच्या मोठ मोठ्या बातम्या छापल्या जातात. अनेक नेत्यांना प्रसिद्धी देवून वृत्तपत्रांनी मोठे केले आहे. त्यांना आमदार, खासदार, मंत्री करण्यात वृत्तपत्रांचा मोठा वाटा आहे. अगदी ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषद, नगर पालिका आदी कार्यकर्त्यांच्या पाठीशी वृत्तपत्रे उभी राहिली आहेत. परंतु हीच नेते मंडळी व कार्यकर्ते वृत्तपत्रांना जाहिराती देत नाहीत, जाहिराती देण्यासाठी आपला हात आखडता घेतात. मात्र निवडणुकीमध्ये कोट्यावधी रूपयांची उधळपट्टी करतात. अगदी गल्ली बोळात निवडणुक काळात हीच मंडळी लाखो रूपये रेवड्या–फुटाणे वाटावेत तसे वाटतात. परंतु त्यांना मोठे करणाऱ्या वृत्तपत्रांकडे कानाडोळा करतात. वृत्तपत्राचा वर्धापन दिन असेल, दीपावली अंक असेल अथवा नेत्यांचे वाढदिवस असतील जाहिराती देण्याचे टाळतात. काही नेते जाहिराती देतात बिले देत नाहीत. तर दुसरीकडे लावणी महोत्सव साजरे करून बायका नाचवायच्या व कोट्यवधीचा खर्च करायचा असेही काही नेत्यांचे धंदे आहेत. तर काही नेते तर स्वत:ला राष्ट्रीय नेते म्हणवून घेतात व नुसते गोड बोलतात. गोड बोलण्याने वृत्तपत्रे चालत नाहीत किंवा तुमच्या मोठेपणाच्या कोरड्या आश्वासनावर सुद्धा वृत्तपत्रे चालत नाहीत.

वृत्तपत्राच्या खर्चाचा विचार केल्यास आज अनेक पटींनी खर्च वाढलेला आहे. तीन–पाच रूपयात काय मिळते? वृत्तपत्रे सामान्य माणसांचा आजही मोठा आधार आणि विश्वास आहे. सामान्य माणूस मग तो ग्रामीण भागातील असो की शहरी माणुस असो तो आजही लाखोंच्या संख्येने वृत्तपत्रांचे वाचक आहेत. आम्ही छापलेल्या बातम्या त्यांच्यापर्यंत पोचतात. अजूनही सामान्य जनतेचा छापील वृत्तपत्रावर व त्यातील बातम्यावरच विश्वास आहे आणि म्हणुन ही सर्व मराठी वृत्तपत्रे ठामपणे उभी राहणे आवश्यक आहे. म्हणून नेते व कार्यकर्त्यांच्या जाहिरातरूपाने सहकार्याची अपेक्षा आहे.

परंतु जे नेते व कार्यकर्ते मग ते कोणत्याही पक्षाचे असोत. स्थानिक वृत्तपत्रांना जाहिराती देत नसतील त्यांच्या बातम्यावर बहिष्कार टाकण्याचा व त्यांच्या बातम्या छापण्यास टाळण्याच्या बीडच्या संपादकांनी आपापसात संवाद करून निर्णय घेतला आहे. लवकरच सर्व संपादकांची बैठक बोलावली जाणार असल्याचे संयोजकांनी म्हटले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार ५ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## 8 व्या वेतन आयोगाने पुन्हा आशा जागविली, 2026 पासून वेतनात होऊ शकते इतकी वाढ



८ व्या वेतन आयोगाच्या संदर्भातील बातम्यांनी पुन्हा एकदा कर्मचाऱ्यांच्या आशा उंचावल्या आहेत. या संदर्भात लाभ पदरी पडण्यासाठी २०२८ उजाडणार आहे. परंतू याचा परिणाम आधी पासूनच जाणवायला लागणार आहे. अंदाजानुसार देशाच्या सुमारे ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि सुमारे ६५ लाख पेन्शनधारी या आयोगाचे लाभार्थी होणार आहेत.बातमीनुसार १ जानेवारी २०२६ पासून या वेतन सुधाराला आधारभूत मानले जाईल आणि याच तारखेपासून कर्मचाऱ्यांना नवीन सॅलरीनुसार पैसे मिळायला सुरुवात होईल.

वेतन आयोगाचा सर्वात महत्वाचा मुद्दा फिटमेंट फॅक्टर आहे. जो सध्याच्या वेतनाच्या एक गुणांकाने वाढतो. यामुळे बेसिक वेतनाचा नवीन आकडा निश्चित होतो. गेल्या सातव्या वेतन आयोगाच्या वेळी हा फॅक्टर २.५७ होता.ज्यामुळे किमान बेसिक वेतन ७००० रुपयांवरुन थेट १८, ००० रुपयांपर्यंत पोहचले होते. या वेळी विविध बातम्यांमध्ये फिटमेंट फॅक्टरबद्दल वेगवेगळे अंदाज व्यक्त केले जात आहेत. कोणी १.९२ तर कोणी २.८६ चा अंदज लावत आहे. परंतू तज्ज्ञांच्या मते यंदा सुमारे २.४६ चा फिटमेंट फॅक्टर लागू होऊ शकतो महागाई भत्ता आता मूळ वेतनात सामील ?

यंदा एक खास बदल हा ही होऊ शकतो की महागाई भत्ता थेट बेसिक वेतनात मर्ज होऊ शकतो. याचा अर्थ हा होईल की महागाई वाढल्यानंतर स्वतंत्र भत्ता देण्याऐवजी वेतनात वाढ होईल. यामुळे वेतना वाढीचा परिणाम अधिक जास्त होईल. आणि फिटमेंट फॅक्टरला महत्व असणार हे ही खरे मानले जात आहे.नवीन वेतनाने किती होईल फायदा?

जर आपण २.४६ फिटमेंट फॅक्टरला आधार मानला तर वर्तमानात जे किमान बेसिक वेतन १८,००० रुपये आहे ते वाढून सुमारे ४४,००० रुपये होईल. हे लेव्हल-१ कर्मचाऱ्यांसाठी नवीन बेसिक वेतन असेल. यात महागाई भत्त्याची रक्कम समाविष्ठ नसेल. परंतू हाऊस रेंट अलाऊन्स (HRA) स्वतंत्रपणे शहराहून मिळेल.

नव्या वेतनाचा हिशेबसोप्या भाषेत म्हणायचे तर जुन्या बेसिक वेतनाला २.४६ ने गणाकार करुन ८ व्या वेतन आयोगाचे नवीन वेतन मिळेल. त्यामुळे लेव्हल-१ ते लेव्हर -१८ पर्यंतच्या सर्व कर्मचारी प्रभावित होतील. यामुळे केवळ पगारात वाढ होईल असे नव्हे तर सरकारी कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

# लातूरच्या लेकीची उत्तुंग भरारी!

लातूरच्या रेणापूरमधील विद्यार्थीनी मदिया खदीर सय्यद हिने जुलै २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या अखिल भारतीय व्यवसाय(ITI) परीक्षेत ९९.६६ टक्के गुण मिळवून भारतात दुसरे स्थान प्राप्त केले आहे. मदियाने मिळवलेल्या या यशाचे कौतुक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिचा सन्मान करत केले आहे. मदियाच्या सततच्या प्रयत्नांमुळेच तिला हे यश प्राप्त करता आले. मदियाने मिळविलेल्या यशासाठी तिचे व तिच्या परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन. मदियाने प्रचंड कष्टातून मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. वडील बांधकाम कामगार असून त्यांच्या कष्टाची जाण ठेवत, स्वतःची ध्येय पूर्ण करण्यासाठीची मदियाची ईच्छाशक्ती खरंच कौतुकास्पद आहे.

भविष्यात देखील मदिया तिच्या सातत्यपूर्ण अभ्यासातून जिद्दीने यश मिळवत राहील. मदिया सय्यदला तिच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.



# सोमवारी सारखणी येथे शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : किनवट माहूर तालुक्यात सर्वत्र सततच्या पावसामुळे अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून या पूर परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांचे घरे पाण्याखाली गेल्याने अतोनात नुकसान झाले असून सरकारच्या वतीने त्वरित नुकसान भरपाई देण्यात द्यावी या मागणीसाठी तालुक्यातील सारखणी येथे बाधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट प्रति हेक्टरी ५० हजार



रुपये अनुदान व पिक विमा आदींसह विविध मागण्यासाठी सोमवार दि.६- ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता किनवट माहूर या राष्ट्रीय महामार्गावर सारखणी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत किनवट तहसीलदार - यांना शेतकऱ्यांच्या वतीने पिंटू आशीर्वाद पाटील वायफनीकर यांनी रास्ता रोको आंदोलनाचे निवेदन देण्यात दिले.ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी किनवट माहूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# हदगावच्या ज्येष्ठ पत्रकारास शिवीगाळ करणाऱ्या शिक्षक दांपत्याविरुद्ध तात्काळ कारवाई करा

## नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे मागणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड - बातमी विरोधात का छापली असे म्हणून एका ज्येष्ठ पत्रकारास जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक दांपत्याने अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून तुला पाहून घेतो धमकी दिल्याचा प्रकार पुढे आला आहे. या प्रकरणात जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांची भेट घेऊन त्या शिक्षक दांपत्याविरुद्ध कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. हदगाव तालुक्यातील भानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक सुनील नारायण मोरे आणि पदवीधर शिक्षिका धम्मशिला कौठेकर यांच्या वर्तनावरोधात तसेच शाळेतील उपस्थितीसंदर्भात लहुजी शक्ती सेना हदगाव या संघटनेकडून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देऊन या दोन्ही शिक्षकांची तक्रार केली होती. या तक्रारीच्या आधारे हदगाव येथील ज्येष्ठ पत्रकार पंडित पतंगे यांनी दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रात बातमी प्रकाशित केली होती. ही बातमी प्रकाशित झाल्यानंतर या दोन्ही शिक्षकांनी मोबाईलद्वारे पंडित पतंगे यांना संपर्क साधला. त्यांना मोबाईलवर अर्वाच्च शिवीगाळ करत तुला पाहून घेतो अशी धमकीही दिली. याप्रकरणी नांदेड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवारी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे, माजी जिल्हाध्यक्ष गोवर्धन बियाणी यांच्या नेतृत्वाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांची भेट घेण्यात आली. झालेल्या प्रकरणासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी कावली यांना जिल्हा पत्रकार संघाचे



अध्यक्ष पांडागळे यांनी सविस्तर माहिती देत या प्रकरणातील शिक्षक दांपत्याविरुद्ध कठोर प्रशासकीय कारवाई करावी अशी मागणी केली. माजी जिल्हाध्यक्ष गोवर्धन बियाणी यांनीही हा प्रकार शिक्षकवृंदांकडून होणे धक्कादायक असल्याचे सांगितले. अशा शिक्षकांना वेळीच आवर घालावा, अशी मागणीही बियाणी यांनी यावेळी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, अशी माहिती यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कावली यांनी दिली. यावेळी जिल्हा सरचिटणीस अनुराग पोवळे, नांदेड महानगराध्यक्ष रवी संगनवार, हदगाव तालुकाध्यक्ष संजय सूर्यवंशी, पत्रकार प्रवीण खंदारे, किरण कुलकर्णी, राम तरटे, गजानन कानडे, बालाजी वैजाळे, शरद काटकर, अंकुश सोनसळे, प्रशांत गवळे, ॲड.प्रमोद नरवाडे, गौतम वाठोरे, वैजनाथ गडूप, सुनील व्यवहारे, राहुल बहादुरे, सचिन मुगटकर, यादव सुकापुरे, पंडितराव पतंगे, गजानन पाटील, गौतम कदम, शेख जुनेद, के. डी. पवार, अरविंद भोरे, प्रवीण दुधारे, अरविंद जाधव यासह जिल्हाभरातील पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नाजेर कुरेशी यांचे नगर परिषद समोर चा आंदोलन मांगे घेण्यात आले , मुख्याधिकारी यांच्या आश्वासनपत्रावर आंदोलन स्थगित,

माजलगांव प्रतिनिधि नाजेर कुरेशी, माजलगांव नगर परिषद समोरचा आंदोलन मांघे घेऊण महेबुबनगर मध्ये मुरुम टाकूण नळाची पाईप लाईन करुन देण्यात येईल असे नगर परिषदने कळविले आहे पत्रकार नाजेर कुरेशी यांनी दि.02/10/2025 रोजी बेशरमचे झाडे देऊन आंदोलन करत होते नगर परिषद प्रशासन मुख्यधिकारी यांनी आंदोलन करत्यास आश्वासनपत्र देऊण आंदोलन स्थगित करण्यात सागितले नगर परिषद मुख्याधिकारी यांच्या आश्वासनपत्राला मान राखुण आंदोलन स्थगित करण्यात आले त्यापत्रावर असे नगर परिषदने कळविले आहे की जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत महेबुब नगर येथे रस्ता मजबुतीकरण व नाली बांधकाम करणेचे काम प्रस्तावीत करण्यात आलेले आहे. सदरील कामाची तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता प्राप्त होताच निविदा प्रक्रिया राबवून सदरील कामाचे कार्यारंभ आदेश देवून काम तात्काळ



पूर्ण करुन घेण्यात येईल. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) माजलगांव शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत लवकर महेबुबनगर मध्ये पाईप लाईन करण्यात येईल. तरी मुख्यधिकारी साहेब यांचे लेखी पत्रकाव्दारे आंदोलन मागे घेवून आंदोलन स्थगित करण्यात आले, वेळेनुसार काम न झाल्यास पुणा आंदोलन करणार आहे असा इशारा देण्यात आला आहे,

# अहमदपूरच्या शैक्षणिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद – महात्मा गांधी जयंतीनिमित्त फैज़-ए-आम चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित

## वक्तृत्व स्पर्धेत सलग चौथ्यांदा खाजा गरीब नवाज (के.जी.एन.) उर्दू प्राथमिक शाळा अहमदपूरचे विजयी सिंहासन, काझी मोहियोद्दीन समीयोद्दीनने १५,००० रुपयांचे पारितोषिक पटकावून शाळेचागौरवशाली विजय प्रवास कायम ठेवला

अहमदपूर/प्रतिनिधी शहरातील खाजा गरीब नवाज उर्दू प्राथमिक शाळा (के.जी.एन.) यशाचा चौथा मुकुट आपल्या नावावर करत पुन्हा एकदा शैक्षणिक क्षेत्रात झळाळून उठली आहे. महात्मा गांधी जयंतीनिमित्त फैज़-ए-आम चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने २ ऑक्टोबर २०२५ रोजी अहमदपूर येथे उर्दू माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांपैकी के.जी. एन. शाळेच्या काझी मोहियोद्दीन समीयोद्दीन या तेजस्वी विद्यार्थ्याने ग्रुप अ (५वी ते ७वी) मध्ये प्रभावी भाषण सादर करत परीक्षकांची मने जिंकली आणि १५,००० रुपयांचे रोख पारितोषिक, पदक व सन्मानपत्र पटकावले.




या यशाने शाळेचा आणि अहमदपूरचा पुन्हा एकदा सन्मान वाढविला आहे. या विजयाची मालिका २०२२-२३ मध्ये चाऊस अफान गालिब, २०२३-२४ मध्ये

> काझी मोहियोद्दीन समीयोद्दीन – प्रथम पारितोषिकसलग ४ वर्षे अव्वल क्रमांक – अभूतपूर्व कामगिरीप्रत्येक वर्षी के.जी.एन. शाळेच्या विद्यार्थ्यांचा विजयी झेंडा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शिक्षकांची मेहनत आणि पालकांचा विश्वास या यशामागील मुख्य घटक

चाऊस अफिफ गालिब, २०२४-२५ मध्ये शेख सबा फिरदोस अय्युब यांच्या घवघवीत यशाने सुरू झाली होती आणि आता २०२५-२६ मध्ये काझी मोहियोद्दीनने चौथ्यांदा पहिला क्रमांक मिळवून के.जी.एन. शाळेच्या यशोगाथेला नवा अध्याय जोडला आहे. या अद्वितीय कामगिरीमुळे के.जी.एन. शाळा "वक्तृत्वाची जननी" म्हणून नावारूपास आली असून पालक, शिक्षक व नागरिक यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मुख्याध्यापक शेख महंमद गौस दाऊद सर तसेच शिक्षकवृंद – सय्यद मुबशिर मख्तार, शेख इमरान अली, काजी समियोद्दीन, सय्यद मुदस्सिर, शगुफ्ता आसमी रजा उस्मानी, कोतवाल नर्गिस, निशात मॅडम यांची मेहनत व मार्गदर्शन ठळकपणे जाणवले. संस्थेचे सचिव यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे पहिले सत्र ज्येष्ठ शिक्षक व मराठवाडा साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष शेख जिलानी सर यांच्या अध्यक्षतेखाली झाले, तर दुपारचे सत्र शिक्षण महर्षी व माजी उपनगराध्यक्ष अब्दुल मुजीब पटेल जागीरदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. प्रमुख पाहुणे म्हणून अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले, नगर परिषदेचे मुख्याधिकारी संतोष लोमटे, सामाजिक कार्यकर्ते मोहसीन बायजीद, डॉ. अब्दुल राफे, हबीब मसूद अली, अलीम इसरारसिराज हुसेन, मुंबईचे खान अब्दुल्ला, रजाअली खान लष्करी, मीर अकबर अली, नुसरत कादरी, शेख युनुस सर, शेख मतीन सर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रियाज निचलकर व रियाजोद्दीन काझी यांनी केले, तर आभारप्रदर्शन रियाजोद्दीन काझी यांनी मानले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार ५ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## आता विकणार पाणी, बिसलरी-किन्ले ब्रँडला मोठी टक्कर, स्थानिक रोजगार वाढणार




मुकेश अंबानी यांच्या रिलायन्सन इंडस्ट्रीचे FMCG युनिट रिलायन्स कंझ्युमर प्रोडक्ट्स लिमिटेडने (RCPL) बाटलीबंद पाण्याच्या सेगमेंटमध्ये उडी घेतली आहे. कंपनीने SURE या नावाने मिनरल वाटर लाँच (Reliance Water) केले आहे. या नवीन ब्रँडची किंमत बिसलेरी आणि Kinley पेक्षा अत्यंत कमी आहे. पण पिण्याच्या पाणी विक्रीच्या बाजारात यामुळे खळबळ उडाली आहे. या क्षेत्रात आता वॉर रंगण्याची शक्यता आहे. शुअर हा एक उच्च गुणवत्तेचा ब्रँड आहे. तो बजेट फ्रेंडली असेल. इतर ब्रँडपेक्षा त्याची किंमत अत्यंत कमी असेल. त्यामुळे बाजारपेठेत मोठा खळबळ उडेल. रिलायन्सने यापूर्वी कॅम्पा कोला सारख्या बेव्हरेजजनंतर आणखी एक मोठे पाऊल टाकले आहे. दैनंदिन उत्पादनांच्या बाजारात रिलायन्स उतरले आहे. 30 हजार कोटींच्या पॅकेज्ड पाणी बाजारात रिलायन्स आता मोठा खेळाडू होऊ पाहत आहे. किती आहे Sure ची किंमत 250 मिलीलीटर Sure पाणी बॉटलची किंमत 5 रुपये इतकी आहे. कॅम्पा शुअर येत्या दोन आठवड्यात उत्तर भारतातील बाजारात दाखल होईल. तर या ब्रँडच्या मोठ्या पॅकची किंमत इतर कंपन्यांच्या तुलनेपेक्षा 20-30% कमी आहे. एक लिटर कॅम्प शुअरच्या पाण्याची बॉटल 15 रुपयांना मिळेल. तर बिसलेरी, कोका-कोला, किन्ले, पेप्सिकोची एक्वाफिनाची किंमत सध्या 20 रुपये इतकी आहे. तर दोन लिटरच्या पॅकची किंमत 25 रुपये इतकी आहे. तर दोन लिटर पॅकची प्रतिस्पर्ध्यांची किंमत 30-35 रुपये इतकी आहे.

स्थानिक बाजारापेठेला मोठा फायदा

रिलायन्स कंझ्युमर प्रोडक्ट्स हे नवीन पाण्याचा ब्रँड कॅम्पा शुअरसाठी स्थानिक पाणी उत्पादकांशी करार करण्याची शक्यता आहे. त्यासाठीची तयारी सुरू आहे. त्याआधारे त्वरीत स्थानिक बाजारपेठेत हे उत्पादन येईल. त्यासाठीचा दळणवळणाचा खर्च वाचेल आणि किंमती कमी ठेवण्यासाठी हा प्लॅन यशस्वी ठरेल. यामुळे स्थानिक बाजारपेठेत रोजगार वाढेल. तर 30 हजार कोटींच्या या पाणी सेगमेंटमध्ये मोठी स्पर्धा दिसून येईल.आता जीएसटी कपातीचा अजून फायदा या ब्रँडला होणार आहे. जीएसटी सुधारणामधये पॅकेज्ड पाणी, यामध्ये नैसर्गिक आणि कृत्रिम मिनरल वॉटरचा समावेश आहे. यावर अगोदर 18 टक्के जीएसटी लागू होता. आता हा जीएसटी 5 टक्क्यांवर आला आहे.

# ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फेडरेशनच्या वतीने पुरग्रस्तांना मदतीचा हात
# गेवराई तालुक्यातील आगरनांदूर येथील पुरग्रस्तांना ब्लॅकेटचे वाटप

गेवराई : बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात अतिवृष्टीमुळे अनेक भागात पुरजन्य परिस्थिती निर्माण होवून आपत्तीमुळे अनेक कुटुंबांना बेघर व्हावे लागले असून शेती, जनावरे तसेच घरे यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पूरग्रस्तांच्या मदतीसाठी ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फेडरेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने तालुक्यातील आगरनांदूर येथील पूरग्रस्त कुटुंबांना ब्लॅकेटचे वाटप करुन मायेची ऊब देत मदतीचा हात देण्यात आला.

ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फेडरेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने कॉन्फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष निलेश पवार , सचिव महेंद्र धोणसे, महा.राज्य सचिव प्रमोद शिंदे, पुणे युनिटचे अध्यक्ष अमोल



सांगळे, उपाध्यक्ष दिपक वाडेवाले, राहूल मांजरे, महेंद्र मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दि.४ ऑक्टोबर रोजी तालुक्यातील आगरनांदूर येथे पुरग्रस्त भागातील नागरिकांना ब्लॅकेटच्या रुपात मायेची ऊब देण्यात आली. गावातील १०० महिला व पुरूषांना ब्लॅकेटचे वाटप करण्यात आले. यावेळी गेवराई बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक बालाजी वनवे यांच्यासह अधिकारी ,कर्मचारी तसेच सरपंच श्रीराम काळे, युवराज कोकरे , दिनकर काळे, अविनाश थोरात, उमेश वाघमारे, पत्रकार विनोद पौळ, अशोक मोताळे, बदामराव काळे, रशिद शेख, कर सल्लागार शुभम काळे, ज्ञानेश्वर काळे, मुन्ना शेख, दादाराव मोटे, योगेश काळे यांच्यासह पुरग्रस्त भागातील महिला व पुरुष उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जोपासत ब्लॅकेटचे वाटप केल्याबद्दल ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फेडरेशनचे पुरग्रस्त भागातील नागरिकांनी आभार व्यक्त केले.


# जिल्हा रुग्णालयाला 'देवदूताची' गरज...!
# "सीएस" साहेब बाहेर निघा, रुग्णांचे हाल बघा..!

### रुग्ण व नातेवाईकांच्या जागी कुत्र्यांचा कब्जा; प्रशासनाने कुत्र्यांसाठी वेगळं विश्रामगृह बांधावं, नागरिकांची मागणी

बीड : जिल्हा रुग्णालय हा सर्वसामान्य गरजू रुग्णांसाठी शेवटचा आधार असतो. मात्र या रुग्णालयातील व्यवस्थापनातील त्रुटी आणि प्रशासनातील निष्क्रियता यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आजही अनेक हाल सहन करावे लागत आहेत. अपुऱ्या रक्तसाठ्यापासून ते तपासणी यंत्रणेची देखभाल न होणे, स्वच्छतेकडे दुर्लक्ष, डॉक्टर व नर्सिंग स्टाफचा तुटवडा या समस्यांनी रुग्णालय त्रस्त आहे. आपत्कालीन विभागात तासन्तास थांबूनही रुग्णांना उपचार मिळत नाहीत, अशी तक्रार नागरिकांकडून होत आहे. गरीब रुग्णांकडे खासगी रुग्णालयात जाण्याची आर्थिक क्षमता नसल्याने ते जिल्हा रुग्णालयावरच विसंबून असतात. मात्र येथे योग्य सुविधा न मिळाल्याने त्यांच्या वेदना वाढतात. "सीएस साहेबांची कॅबिन स्वच्छ, पण वॉर्डात दुर्गंधी!" रुग्णालयातील सीएस साहेबांची कॅबिन जशी टिपटॉप ठेवली जाते, तशीच देखभाल जर संपूर्ण रुग्णालयाची केली गेली असती, तर रुग्ण समाधानी झाले असते, अशी जनतेत चर्चा आहे. वॉर्डात घुसताच येणारा घाण वास आणि अस्वच्छतेमुळे रुग्ण व नातेवाईक त्रस्त आहेत. "रुग्णांनाजागानाही,पणकुत्र्यांचाकब्जा!" वॉर्डात रुग्णांना झोपायलाही स्वच्छ जागा मिळत नाही, मात्र कुत्र्यांनी मात्र आपला कब्जा हक्काने बजावला आहे. प्रशासनाने कुत्र्यांसाठी स्वतंत्र विश्रामगृह उभारावे,



अशी नागरिकांची मागणी आहे. रक्तसाठा अपुरा, उपकरणे



निकामी, 'तारीख पे तारीख'! गरोदर महिला असो की आपत्कालीन रुग्ण, त्यांना लागणारा रक्तसाठा वेळेवर मिळत नाही. शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य पुरवण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. त्यामुळे रुग्णांना "तारीख पे तारीख" मिळत असून त्यांचे हाल वाढले आहेत.

वनिता ताईंची संवेदनशीलता! प्रशासनापेक्षा वनिता जाधव या कर्मचाऱ्यांना रुग्णांची अधिक काळजी असल्याचे दिसून येते. "वो साहेब, पाण्याच्या टाकीजवळ लाईट तरी लावा!" अशी हाक देत त्या स्वतः प्रयत्नशील असतात. महिलांसाठी इसिजी विभागात महिलाच असाव्यात! महिलांच्या इसिजी तपासणीदरम्यान पुरुष कर्मचारी असणे हे अस्वस्थ करणारे ठरत आहे. त्यामुळे या विभागात महिला कर्मचारी नेमाव्यात, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे. "माणसं मारण्याच्या नव्हे, जगवण्याच्या शर्यतीत जिल्हा रुग्णालय अव्वल व्हावं" — हीच जनतेची अपेक्षा आहे.



# सप्तरंग प्रतिष्ठानचा शिरूर कासार मधील पूरग्रस्तांना आधार..



शिरूर (प्रतिनिधी) : अलीकडील मुसळधार पावसामुळे शिरूर कासार परिसरात आलेल्या पूरामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. घरगुती साहित्य, जनावरांचे चारा, अन्नधान्य या सर्वांवर मोठे नुकसान झाले आहे. या संकटाच्या काळात सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान पुढे सरसावले असून पूरग्रस्त जनतेला मदतीचा हात दिला आहे. प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी शिरूर कासार मधील प्रभावित भागात भेट देऊन कपडे आणि आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

तसेच पुढील काही दिवस गरजूंना वैद्यकीय मदत व पुनर्वसनासाठी सहकार्य देण्याची प्रतिष्ठानने ग्वाही दिली आहे. सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष यांनी सांगितले की, "आपत्तीच्या काळात एकमेकांना साथ देणे हीच खरी मानवतेची सेवा आहे. शिरूरमधील पूरग्रस्त कुटुंबांना शक्य ती सर्व मदत आम्ही देऊ," असे ते म्हणाले. या उपक्रमात प्रतिष्ठानचे सर्वच सदस्य, स्थानिक तरुण व ग्रामस्थ यांनी उत्साहाने सहभाग घेतला. ग्रामस्थांनी या मदतीबद्दल समाधान व्यक्त करत संस्थेचे आभार मानले...

"पूर आला, पण माणुसकी आम्ही वाहू देणार नाही!"- अलीम सय्यद
पूरात हरवलेलं सर्व आणता येत नाही, पण थोडीशी मदत त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू आणू शकते.- रफिक पटेल
"संकटात साथ — हीच खरी माणुसकीची ओळख!"- वसीम मणियार
पूरग्रस्तांना मदत प्रतिष्ठान मार्फत करत राहू - साजेद पाशा
प्रतिष्ठानमार्फत सेवेचा हा वसा वारसा वाहवत ठेवू.- सफदर देशमुख
निःस्वार्थ सेवा हीच खरी साधना आहे - समीर सरकार
सेवेने सलोखा निर्माण करू - नदीम सर
समाजसेवेनेच मानवतेचा दीप प्रज्वलित राहतो!"- सोफियान मणियार

# वडवणी बॉईज केंद्राची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

_वडवणी (प्रतिनिधी) शनिवार, दि 3 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,साळिंबा या ठिकाणी वडवणी केंद्राची तिसरी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आज दि. 3 ऑक्टोबर 2025 रोजी अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाली.या परिषदेचे उद्घाटन वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेला केंद्रप्रमुख श्री धायतिडक साहेब,केंद्रीय मुख्याध्यापक श्री देशमुख साहेब,साळिंबा गावचे सरपंच श्री दिनेश नाईकवाडे साहेब,शा.व्य.स.अध्यक्ष श्री. सतिशजी खाडे साहेब,श्री.ह.भ.प.हरिदास महाराज सोळंके सर, शिक्षणप्रेमी श्री अंबादासजी जाधव साहेब, तज्ञ मार्गदर्शक श्री महादेव डोरले सर आणि श्री राजू दास राठोड ( मु.अ.साळिंबा ) इत्यादी मान्यवर उपस्थित होते......त्याच प्रमाणे केंद्र वडवणी अंतर्गत सर्व शाळांचे मुख्याध्यापक तथा सर्व शिक्षक बंधू-भगिनीं यांची या परिषदेला उपस्थिती लाभली. परिषदेची सुरूवात राष्ट्रगीताने करण्यात आली.या परिषदेसाठी केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब अध्यक्ष भुषविले.त्यानंतर व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.इयत्ता वी च्या विद्यार्थ्यीनींनी स्वागतम...सुस्वागतम.. .हे गीत गायण करून मान्यवरांचे तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे शब्द-काव्य पुष्पांनी स्वागत केले.तदनंतर वडवणी केंद्रातून बदली होऊन इतर ठिकाणी गेलेल्या शिक्षक



बंधू-भगिनींना मान्यवरांच्या हस्ते शाल आणि झाड देऊन निरोप देण्यात आला. त्याचप्रमाणे इतर केंद्रातून वडवणी केंद्रातील शाळांमध्ये नवीन रुजू झालेल्या सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे मान्यवरांच्या हस्ते सन्हदय शाल, पुष्पगुच्छ आणि झाड देऊन स्वागत करण्यात आले.त्या नंतर केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब यांनी शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाची रुपरेषा आणि काही शासकीय महत्वाच्या विषयाला ओघवता स्पर्श केला. तदनंतर श्री डोरले सर यांनी आपली तासिका खान अकॅडमी पोर्टल नोंदनी व माहिती दिली.त्याचप्रमाणे श्री राठोड सर यांनी जयंत नारळीकर विज्ञान व गणित समृद्धी कार्यक्रम या संदर्भात इत्यंभूत माहिती आपल्या तासिकेच्या माध्यमातून दिली.अतिशय चवदार असा व्हेज पुलाव आणि स्वादिष्ट जिलेबीच्या सर्व उपस्थितांनी अस्वाद घेतला. क्षुदा तृप्ती नंतर श्री राठोड सर यांनी प्रोजेक्टर च्या माध्यमातून काही महत्वाच्या संकल्पना समजाऊन सांगितल्या.या सर्व कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन श्री खाटवकर सर यांनी केले.तर कार्यक्रमाचे आभार श्री शिंदे सर यांनी माणले.या शिक्षण परिषदेचे आयोजन आणि सौजन्य प्रा.शा साळिंबा, प्रा. शा.मामला आणि प्रा.शा.सौंदडवस्ती यांनी पार पाडले.या परिषदेच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री राठोड सर,यंदे सर,शिंदे सर,श्रीम.देखणे मॅडम,अर्जुन शिंदे सर,सोळुके सर,चिबडे सर,श्रीम. सांगळे मॅडम आदी सर्वांनी परिश्रम घेतले. शेवटी वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताने या शिक्षण परिषदेची सांगता करण्यात.शिक्षण परिषदेमध्ये निरोप आणि स्वागत समारंभ हा भावस्पर्शी ठरला,एकंदरीत या कार्यक्रमामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य आणि समाधान दिसत होते, अशा उत्साही वातावरणात वडवणी बॉईज केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात संपन्न झाली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

रविवार ५ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# शर्ट फाडला, भर रस्त्यात मारामारी अन्... पुण्यात शरद पवारांच्या आमदाराला धक्काबुक्की, नेमकं काय घडलं?

पुण्याच्या वडगाव शेरी मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार बापू पठारे यांना काल रात्री उशिरा पुण्यातील लोहगाव परिसरात धक्काबुक्की झाल्याची घटना घडली. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी असलेले बंडू खांदवे यांच्याकडून ही धक्काबुक्की झाल्याचा आरोप आमदार पठारे यांच्या समर्थकांनी केला आहे. या दोघांमध्ये स्थानिक मुद्द्यांवरून शाब्दिक वाद सुरु झाला. यानंतर या शाब्दिक वादाचे रूपांतर झटापटीत झाले. ज्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

नेमकं काय घडलं?

लोहगाव परिसरात माजी सैनिकांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान ही घटना घडली. आमदार बापू पठारे आणि लोहगाव ग्रामपंचायतचे माजी सभापती बंडू खांदवे यांच्यात स्थानिक रस्त्यांच्या कामांवरून शाब्दिक वाद सुरू झाला. हा वाद विकोपाला गेला आणि त्याचे रूपांतर धक्काबुक्की, झटापटीमध्ये झाले. बंडू खांदवे काय म्हणाले?

या घटनेबाबत बोलताना बंडू खांदवे यांनी आरोप केला की, “आमचे आंदोलन प्रशासनाविरुद्ध होते, पण आमदार पठारे यांनी तो विषय स्वतःकडे ओढावून घेत शाब्दिक वाद घातला. या झटापटीत आमदारांच्या तीन-चार सुरक्षारक्षकांनी माझा शर्ट फाडला आणि मला मारहाण केली.”

बापू पठारे काय म्हणाले?

तर दुसरीकडे, आमदार बापू पठारे यांनी खांदवे यांचा आरोप फेटाळून लावला. ते म्हणाले, “येथील रस्त्यांसाठी डिसेंबर २०२३ मध्ये ३१ कोटी रुपये मंजूर झाले होते, मग




२०२४ पर्यंत ते कोणी अडवले? रस्त्यांवर पाण्याच्या आणि ड्रेनेजच्या लाईन्स नव्हत्या, नागरिकांनी त्या जोडल्या नव्हत्या. मग रस्ते करायचे कसे? राजकारण म्हणून आंदोलन करायचे का? ५ वर्षांमध्ये ते सत्तेत होते तेव्हा आर पी (DP) रस्ते का केले नाहीत, कुणी अडवले होते? खोटं राजकारण करू नका, जनता माफ करणार नाही.”

यावरुन रस्त्याच्या कामांवरून लोहगाव परिसरात अनेक दिवसांपासून स्थानिक आमदार आणि इतर पक्षांतील पदाधिकाऱ्यांमध्ये वाद सुरु असल्याचे दिसत आहे. याच वादाचा भाग म्हणून या भागात आंदोलन देखील नियोजित करण्यात आले होते. या घटनेची माहिती मिळताच विमानतळ पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. रात्री उशिरापर्यंत याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया सुरू होती. राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमधील या झटापटीमुळे लोहगाव परिसरात काही काळ मोठा तणाव निर्माण झाला होता.

# माजी सैनिक चंद्रशेखर सावंत यांना समाजरत्न पुरस्कार

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी

माजी सैनिक व पश्चिम रेल्वेतून मोटरमन म्हणून निवृत्त झालेले चंद्रशेखर सावंत यांना नुकताच राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला असून येत्या १२ ऑक्टोबर २०२५ रोजी आदर्श रायगड वृत्तपत्र व वृत्तवाहिनी च्या वर्धापन दिनानिमित्त बदलापूर येथे प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत तो प्रदान करण्यात येणार असल्याचे कार्यकारी संपादक शैलेश सणस यांनी सांगितले. जुलै २०१८ मध्ये म ोटरमन म्हणून कार्य करत असताना इमर्जेन्सी ब्रेक दाबून अंधेरी येथील गोखले ब्रीज ट्रेनवर पडण्यापासून सावंत यांनी हजारो प्रवाशांचे प्राण वाचविले होते.तेव्हा तत्कालीन रेल्वेमंत्री पीयुष गोयल यांनी त्यांना कर्तव्यदक्ष मोटरमन पुरस्कार आणि रोख पाच लाख रुपये बक्षीस दिले होते. सावंत आजही अनेकवेळा स्वतः विविध वंचित,अनाथ, वृद्ध, गरजू यांना जॉय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून मदत करत समाजसेवा करीतच असतात. अशा या आदर्श व्यक्तिमत्वाला समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला म्हणून समाजातील विविध स्तरातून गौरव व अभिनंदन होत आहे.



# कर्णधार म्हणून डच्चू

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावसाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची भारतीय संघात निवड झाली असली तरी यासाठी कर्णधार पदावरून रोहितला डच्चू देण्यात आला आहे.आता शुभमन गिल याच्याकडे भारताचे नेतृत्व देण्यात आले असून त्याच्या हाताखाली विराट आणि रोहितला खेळायला लागणार आहे.रोहित आतापर्यंत धोनी नंतरचा सर्वात यशस्वी कॅप्टन होता. त्याने ५६ पैकी ४२ एकदिवसीय सामने जिंकले होते.धोनीनंतर आय सी सी च्या मर्यादित षटकांच्या ३ अंतिम सामन्यात ( टी २०, विश्वचषक ani आणि चॅम्पियन्स ट्रॉफी) विजेतेपदाचा कर्णधार म्हणून रोहितचा समावेश आहे. असे असले तरी आता गिल कडे एकदिवसीय आणि कसोटी अशा दोन्ही प्रकारात कर्णधार पद सोपवले आहे.२०२७ ला वर्ल्डकप आहे.तोपर्यंत विराट आणि रोहित संघात असतील की निवृत्त होतील माहीत नाही. पण आतापासूनच एका नवीन दमाच्या खेळाडूकडे भारतीय निवड सामित्याच्या लोकांनी पाहायला सुरुवात केली असून विश्वचषक जिंकणे हेच आमचे उद्दिष्ट असल्याचे निवड समिती अध्यक्ष अजित आगरकरांचे म्हणणे आहे.एक ना एक दिवस सर्वांनाच निवृत्त व्हायचे आहे, कर्णधारपदाच्या खुर्चीवरून जायचे आहे, रोहित शर्माच्या बाबतीत तो क्षण आता आला की त्याला कर्णधारपदावरून डच्चू मिळाला.

गणेश हिरवे जोगेश्वरी पूर्व

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती साजरी



**माजलगाव – येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करताना प्रा राघवेंद्र मुळी यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, महात्मा गांधी यांची स्वदेशीची प्रेरणा ही आज देशाच्या अर्थव्यवस्थेला अत्यंत गरजेची ठरत आहे तसेच लाल बहादुर शास्त्री यांची देशाबद्दल असणारी राष्ट्र निष्ठा हे अलौकिक उदाहरण आहे. तशाप्रतीच्या राजकारणाची आज आवश्यकता आहे.या वेळी राष्ट्रीय सेवा योजना विभाग अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी प्रास्ताविक केले. सुरुवातीला उपप्राचार्य डॉ गजानन होन्ना यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या कार्यक्रमप्रसंगी डॉ रमेश गटकळ, डॉ जिजाराम बागल, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर, डॉ गोरखनाथ फसले, प्रा.अशोक होके,सुधीर काळे यांची उपस्थिती होती.**

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार केंद्राचे उद्घाटन

माजलगाव प्रतिनिधी दिनांक ०३/१०/२०२५ येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार केंद्राचे नुकतेच उद्घाटन संपन्न झाले. या प्रसंगी उद्घाटक म्हणून उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्रा तसेच अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते.याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. गजानन होंन्रा म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांनी आपल्या महाविद्यालयास वेगवेगळे आठ कोर्से स आजीवन शिक्षण विस्तार विभाग अंतर्गत राबवण्यास दिले आहेत. ते आपण महाविद्यालय म्हणून प्रभावीपणे राबवून या सर्व कोर्सेस ला जास्तीत जास्त प्रवेश प्रक्रिया कशी होईल या दृष्टीने प्रयत्न करूयात. कार्यक्रमाचा




अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, कौशल्य विकास व्हावा या दृष्टीने विद्यापीठाने हे सर्व कोर्सेस सुरू केले आहेत. समाजातील वेगवेगळे घटक जे दहावी व बारावी उत्तीर्ण आहेत असे व्यक्ती या कोर्सेसला प्रवेश घेऊ शकतात व आपला कोर्सेस पूर्ण केल्यानंतर या माध्यमातून ते आपला स्वयंरोजगार प्राप्त करू शकतात. एकीकडे भल्या मोठ्या डिगऱ्या घेऊन सुशिक्षित बेरोजगार भटकत आहेत तर दुसरीकडे असे कौशल्य विकास अंतर्गत येणारे छोटे छोटे कोर्सेस पूर्ण करून आपण स्वयंनिर्वाही रोजगाराच्या संधी प्राप्त करू शकतो. विद्यार्थ्यांनी या कोर्सला प्रवेश घेऊन रोजगाराच्या संधी प्राप्त कराव्यात असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले. यामध्ये

१. दुग्ध व्यवसाय प्रमाणपत्र अभ्यासक्रम – किमान दहावी पास – सहा महिने कालावधी
२. ड्रेस मेकिंग अँड डिझायनिंग अभ्यासक्रम – किमान दहावी पास – एक वर्ष कालावधी ३. बालवाडी अंगणवाडी प्रमाणपत्र अभ्यासक्रम – किमान दहावी पास – सहा महिने कालावधी
४. ग्रामीण पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम किमान बारावी पास सहा महिने कालावधी ५. ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम – किमान बारावी पास – सहा महिने कालावधी
६. विक्री प्रतिनिधी प्रमाणपत्र अभ्यासक्रम – किमान दहावी पास – दोन महिने कालावधी
७. सौंदर्य संवर्धन व व्यक्तिमत्व विकास प्रम ाणपत्र अभ्यासक्रम – दहावी पास – सहा महिने कालावधी
८. सर्टिफिकेट कोर्स इन इनकम्युनिकेटिव्ह इंग्लिश – किमान बारावी पास – सहा महिने कालावधी

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. बाळासाहेब मुंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जिजाराम बागल यांनी केले तर आभार प्रा. अशोक होके यांनी मानले. कार्यक्रमास म हाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# अभिनेत्री संध्या शांताराम यांना भावपूर्ण श्रद्धांजली




४ ऑक्टोबर २०२५

नुकतीच दुःखद बातमी प्रसिद्ध झाली आहे. ती म्हणजे, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री संध्या शांताराम यांची मुंबईत राहत्या घरात सकाळी वयाच्या ८७वर्षी प्राणज्योत मालवली आहे. त्यामुळे मराठी चित्रपट सृष्टीमध्ये ‘हळहळ’ व्यक्त होत आहे.

संध्याजी, आपण मूळच्या केरल च्या कोची इथल्या. आपले मूळ नाव विजया देशमुख. आणि आपल्या सर्वांचे लाडके “चित्रपट महर्षी शांताराम राजाराम वणकुद्रे अर्थात, व्ही शांताराम” यांच्या आपण ‘तिसऱ्या पत्नी’ होत. आपण, एकाच भूमिकेच्या पिंजरा त न अडकता, अनेक चित्रपटांत अभिनयाचे नवरंग रुपेरी पडद्यावर साकार केले आहे. आपले टपोरे डोळे आणि चेहऱ्यावर हावभाव, यातूनच बोलण्याचे अभिनय उत्तम दिसे. जसं जल बिन मछली नृत्य बिन बिजली तसं आपण, झनक झनक पायल बाजे वाजवल्या शिवाय शांत बसत नव्हता. शुटिंग दरम्यान, अपहोप होत असताना, आपण त्या वेळी गाडीमध्ये अमर भूपाळी गीत ऐकत असत. आणि विशेष म्हणजे, आपल्या पतीच्या हाकेला दो आँखे बारह हाथ धावून येत असत. “अरे जा हरे नटखट” या गाण्यासाठी, आपण खास शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण घेतले होते. पण त्या वेळी, कोणतेही ‘नृत्य दिग्दर्शक’ नसल्याने, त्यात फिरणाऱ्या सर्व स्टेप्स आपण आणि व्ही शांताराम यांनी तयार केले होते. ह्या गाण्यात, आपण ‘पुरुष व स्त्री’ अशी दुहेरी वेशभूषा एकाच वेळी करून, त्यावर नाच करत सगळ्यांनाच ‘मंत्रमुग्ध’ केले होते.

आपण, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या “अप्रतिम अभिनय आणि नृत्य कौशल्याने” आम्हा प्रेक्षकांच्या मनावर एक वेगळीच छाप पाडली आहे. आपल्या जाण्याने, मराठी चित्रपट सृष्टीमध्ये एक पोकळी निर्माण झाली आहे. आपणास महाराष्ट्र श्रोत्यांच्या वतीने, “”आपल्याच कलाकृतीतून”” श्रद्धांजली वाहतो आहोत.

**~@ शब्दश्री विलास देवळेकर**
**स्क्रीन रायटर्स असोसिएशन मुंबई - सभासद.**

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com